# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक. :
२५६०१२६४
२५६०१२६५

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ क्र.:पुवि/निववि/465

दिनांक : ३/४/२०१२

प्रति,
मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये.

विषयः— महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचा अनुदानाबाबतचा शासन निर्णय

महोदय/महोदया,

महाराष्ट्र राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालये यु.जी.सी. अधिनियमातील कलम १२बी अंतर्गत अनुदान मिळण्यास पात्र नाहीत अशा महाविद्यालयांना कलम १२बी चा दर्जा प्राप्त होण्यासाठी मुलभूत सुविधांमधील त्रुटी भरुन काढण्यासाठी एक रकमी अनुदान देणेबाबतचा शासन निर्णय सोबत जोडलेली आहे. यांची नोंद घ्यावी.

कळावे,

उपकुलसचिव
नियोजन व विकास

DEVELOPMENT SECTION
INWARD NO. 644
DATE 25/3/12

मा. कुलसचिव कार्यालय
पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक क्र.-आर/ 734
दिनांक - 21/03/12
जावक दिनांक- 21/03/12
विभाग - D/BCUD.

Inward No.:
Date : 948
BCUD 21-3-12
University of Pune

**राज्यातील जी अशासकीय अनुदानित महाविद्यालये यु.जी.सी. अधिनियमातील कलम १२ बी अंतर्गत अनुदान मिळण्यास पात्र नाहीत अशा महाविद्यालयांना कलम १२ बी चा दर्जा प्राप्त होण्यासाठी मुलभूत सुविधांमधील त्रुटी भरुन काढण्यासाठी एकरकमी अनुदान देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र अर्थसं २०११/ (१४६/११)/मशि-३**
**मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक: १५ मार्च, २०१२**

DR (Dev)
DR (ACAD)

**वाचा:** १ शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनजीसी २००७/(३६३/०७)/मशि-३, दिनांक १९ डिसेंबर, २००८.
२.शासनपत्र क्रमांक MISC २००९/(७९/०९)/विशि -२, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९
३.विद्यापीठ अनुदान आयोगाचे क्रमांक एफ.१-८/२००८(cpp-II), दिनांक २८ जून, २०१०

**प्रस्तावना:-**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांबाबत विहित केलेले निकष पुर्ण करत नसल्याने राज्यातील जी अशासकीय अनुदानीत महाविद्यालये विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९५६ मधील कलम १२ (बी) अंतर्गत महाविद्यालयाच्या शैक्षणिक विकासासाठी निधी मिळण्यास अपात्र ठरतात अशा महाविद्यालयांना पायाभूत सुविधामधील त्रुटी पूर्ण करुन त्याद्वारे विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियमातील कलम १२ (बी) अंतर्गत निधी मिळण्यास पात्र ठरण्यासाठी एकवेळचे अनुदान देण्याची योजना केंद्र शासनाने घोषीत केली. त्या अनुषंगाने अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ज्या महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९५६ मधील कलम १२ (बी) चा दर्जा प्राप्त झालेला नाही, अशा महाविद्यालयांना १२ (बी) चा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी एकवेळचे अर्थसहाय्य देण्याची योजना केंद्रशासनाने तयार केली आहे (one time catch-up grant to those colleges which are not covered under section 12B of UGC Act 1956). त्यामध्ये अशा महाविद्यालयांना आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा उदा. महाविद्यालयासाठी इमारत, मुला मुलींचे

संचालक, मविविमे

Shri kadam

वसतिगृह, प्रयोगशाळा, ग्रंथालय व इतर आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध होण्यासाठी एक वेळचे अनुदान म्हणून जास्तीत जास्त रु. २.०० कोटी एवढी रक्कम मंजूर होऊ शकते. सदर रक्कमेपैकी ५० टक्के रक्कम विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत अनुदान म्हणून देय आहे.

केंद्र शासनाने सुरु केलेली ही योजना राज्यामध्ये राबवून त्याद्वारे राज्यातील महाविद्यालयांचा व एकूणच राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व्हावा या उद्देशाने ही योजना राज्यामध्ये राबविण्यास राज्य शासनाने आपली सहमती केंद्र शासनास शासन पत्र क्र. संकीर्ण २००९/(७९/०९)/ विशि-२, दि. २७.२.२००९ द्वारे कळविलेली आहे.

**शासन निर्णय-**

१. राज्यातील ज्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९५६ मधील कलम १२ (बी) चा दर्जा प्राप्त झालेला नाही, त्या महाविद्यालयांना १२ बी चा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी एकवेळचे अर्थसहाय्य देण्याची केंद्र शासनाने तयार केलेली योजना राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. राज्य शासनाचे पत्र क्र. संकीर्ण २००९/(७९/०९)/विशि-२, दि. २७.२.२००९ द्वारे केंद्रशासनास सदर योजना राबविण्यास सहमती दिल्यानंतर या योजनेखाली अनुदान मिळण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार ज्या महाविद्यालयांनी आपले प्रस्ताव संबंधित विद्यापीठामार्फत विद्यापीठ अनुदान आयोगास पाठविले आहेत ते या योजनेखाली पात्र राहतील शिवाय ज्या महाविद्यालयांनी प्रस्ताव पाठविले नाहीत त्यांनी आपले प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगास सादर करावेत.

२. या योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाचे प्रमाण भागीदारी ५०:२५:२५ असे राहील (विद्यापीठ अनुदान आयोग ५० टक्के: संबंधीत संस्था २५ टक्के: राज्य शासन २५ टक्के).

३. विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयाच्या प्रस्तावास मंजूरी दिल्यानंतर सदर आयोगामार्फत मिळणारी ५०टक्के रक्कम प्राप्त झाल्यानंतर संस्थेच्या हिस्स्याची २५ टक्के रक्कम तसेच विद्यापीठ अनुदान अयोग अधिनियम १९५६ मधील कलम १२ (बी) अंतर्गत निधी मिळण्यास संबंधीत महाविद्यालय पात्र ठरण्यासाठी व हाती घेतलेला प्रकल्प पूर्ण

होण्यासाठी आवश्यक असलेली उर्वरित रक्कम उपलब्ध करुन देण्यास संबंधीत संस्था तयार असल्याचे बंधपत्र संबंधीत संस्थेने शासनास सादर केल्यानंतर शासनाकडून देय असलेली उर्वरित २५ टक्के रक्कम देण्यास शासन तयार असल्याचे बंधपत्र देण्यात येईल.

४. विद्यापीठ अनुदान अयोगामार्फत मिळणारी रक्कम, संबंधीत संस्थेमार्फत देय असलेली रक्कम तसेच शासनामार्फत मिळणारी रक्कम ठेवण्यासाठी संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडावे आणि या योजनेअंतर्गत प्राप्त होणारी सर्व रक्कम त्याच खात्यावर जमा करावी.

५. विद्यापीठ अनुदान अयोगामार्फत मंजूर झालेली रक्कम तसेच संस्थेच्या हिस्स्याची देय असलेली रक्कम स्वतंत्र खात्यावर जमा झाल्यानंतर शासन अनुदानाची २५% रक्कम वितरित केली जाईल.

६. ज्या प्रमाणात विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत निधी वितरित केला जाईल त्याचप्रमाणात शासनाकडून देय असलेली रक्कम वितरित केली जाईल.

७. राज्य शासनामार्फत देय असलेली रक्कम देण्यास शासन तयार असल्याबाबतचे बंधपत्र मिळण्यासाठी संबंधीत महाविद्यालयांनी आपला प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावा. संचालक, उच्च शिक्षण यांनी सदर प्रस्तावाची सखोल छाननी करुन तो प्रस्ताव योग्य त्या शिफारशीसह शासनास सादर करावा.

८. या योजनेसंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेले निकष तसेच मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

९. या योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीची उपयोगीता प्रमाणपत्रे वेळोवेळी शासनास तसेच विद्यापीठ अनुदान आयोगास सादर करण्यात यावीत.

१०. या योजनेद्वारे प्राप्त होणारा निधी व त्याद्वारे करण्यात येणारी कामे ही महालेखापाल यांच्या लेखापरिक्षणासाठी पात्र राहतील.

या योजनेवर होणारा खर्च मागणी क्र. डब्ल्यु-२, २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०३ विद्यापीठीय व उच्च शिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२)(०५) विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियमातील कलम

१२ (बी) अन्वये अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना विकासासाठी अनुदान (२२०२ एच ०४६) ३१ सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखाली उपलब्ध तरतूदीमधून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमाक २९/१४७१, दि. ७.२.२०१२ आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमाक १३/व्यय-५, दि. २३.२.२०१२ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra . gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१२०३१४०६२६२३३२३००१ असा आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सदाशिव शिवदास)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. कुलपती, महाराष्ट्र राज्य, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
४) मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव.
५) मा.राज्यमंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव.
६) प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
७) कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे.
८) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
१०) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
११) महालेखापाल(लेखा वअनुज्ञेयता) महाराष्ट्र १ मुंबई/२ नागपूर.
१२) महालेखापाल(लेखा परीक्षा) महाराष्ट्र १ मुंबई/ २ नागपूर.
१३) उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व कार्यासने.
१४) निवड नस्ती मशि-३.